कृष्णा एक्सप्रेस
www.krishnaexpress.in
24 Aug 2025 - Page 2

# कराड येथे सायबर सुरक्षा जनजागृती सत्र उत्साहात



कराड : डिजिटल तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढणाऱ्या वापरामुळे आजच्या समाजात सायबर गुन्ह्यांचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे. नागरिक आणि शासकीय विभागातील कर्मचारी वर्ग यांना सजग करण्यासाठी कराड फायर ब्रिगेड विभागात सायबर सुरक्षा जन जागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम किक हील फाऊंडेशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या Cyber Shiksha for Cyber Suraksha या विशेष मोहिमेचा भाग होता. कराड येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सायबर शक्ती क्लब च्या सहकार्याने हे सत्र यशस्वीरीत्या पार पडले. या कार्यक्रमात सायबर वॉरियर्स प्रथमेश खंडागळे आणि पद्मनाभ माळवदे यांनी फायर ब्रिगेडच्या अधिकारी व जवानांना सविस्तर मार्गदर्शन केले. इंटरनेट व सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाईन फसवणुकीचे नवे प्रकार, नोकरी संदर्भातील भ्रामक जाहिराती, बँकिंग फसवणूक, डेटा सुरक्षिततेचे महत्त्व, तसेच डिजिटल व्यसनाचे दुष्परिणाम यामहत्त्वाच्या विषयांवर त्यांनी माहिती दिली. विविध प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे नागरिकांना भेडसावणाऱ्या सायबर समस्यांचे वास्तव चित्रण करून त्यावर तात्काळ आणि उपयुक्त उपाययोजना सुचविण्यात आल्या, ज्यामुळे सहभागींच्या मनात सायबर सुरक्षिततेबाबत ठोस जागरूकता निर्माण झाली

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फायर ब्रिगेड विभागाचे प्रमुख श्री. श्रीकांत देवघरे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की, सायबर गुन्हेगारांची पद्धत दिवसेंदिवस अधिक प्रगत होत आहे. अशा परिस्थितीत अशा जनजागृती सत्रांची अत्यंत गरज आहे. या माध्यमातून मिळणारे ज्ञान केवळ वैयक्तिक सुरक्षेसाठीच नाही तर समाजात योग्य संदेश पोहोचविण्यासाठी ही उपयोगी ठरेल. या उपक्रमाचे मार्गदर्शन क्लब प्रकल्प समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांनी केले, तर गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराडचे प्राचार्यडॉ. एस. जे. बाघ यांनी या उपक्रमासाठी विशेष प्रोत्साहन दिले.

सायबर शक्ती क्लब च्या या उपक्रमामुळे शासकीय विभागांमध्ये सायबर सजगतेची बीजे रोवली जात असून, यामुळे भविष्यात अधिक सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल समाजाची निर्मिती होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या उपक्रमातून केवळ शासकीयक र्मचारीच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांमध्येही डिजिटल सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण होऊन प्रत्येक व्यक्ती सायबर जबाबदार नागरिक बनणे हीच खरी यामोहिमेची मोठी कामगिरी ठरेल.